Original Article
ISSN (Online): 2582-7472

ShodhKosh: Journal of Visual and Performing Arts
July 2024 5(7SE), 215–218

# DEMOCRACY AND GOVERNANCE IN THE 21ST CENTURY

# 21व्या शतकातील लोकशाही आणि शासन

Dr. Ganpat Ramrao Karikante [1]

[1] Vai Dhunda Maharaj Deglurkar College, Tal. Deglur, Dist. Nanded, India

https://crossmark.crossref.org/dialog/?doi=10.29121/shodhkosh.v5.i7se.2024.5883&domain=pdf&date_stamp=2024-07-31

**DOI**
**10.29121/shodhkosh.v5.i7SE.2024.5883**

**Funding:** This research received no specific grant from any funding agency in the public, commercial, or not-for-profit sectors.

**Copyright:** © 2024 The Author(s). This work is licensed under a Creative Commons Attribution 4.0 International License.

With the license CC-BY, authors retain the copyright, allowing anyone to download, reuse, re-print, modify, distribute, and/or copy their contribution. The work must be properly attributed to its author.

OPEN ACCESS

## ABSTRACT

**English:** The 21st century has brought new opportunities and challenges for democracy and governance. With the advancement of technology and the pace of globalization, political participation, accountability and the pace of governance have changed radically. India is the largest functioning democracy in the world. The reason for this is not only its vast size, but also its pluralistic nature and its ability to stand the test of time. Democratic traditions and principles are an integral part of Indian culture. Qualities like equality, tolerance, peaceful coexistence and a way of life based on democratic values have existed in our society for centuries. Real democracy has deeply ingrained our political consciousness. Democracy based on principles like equality, representation and participation is undergoing major changes in the 21st century. The rapid spread of information, growing populism, growing concern about inequality and global crises like climate change and pandemics have tested the resilience of democratic institutions. This article examines the interrelationship between democracy and governance in this 21st century and explores ways to strengthen democracy and governance to meet the current challenges. It will also explore the development of democracy in the modern era, the impact of technological and socio-political changes, and the need for accountable and sustainable governance systems.

**Hindi:** 21वे शतक लोकशाही आणि शासनासाठी नव्या संधी आणि आव्हाने घेऊन आले आहे. तंत्रज्ञानाच्या प्रगतीसह आणि जागतिकीकरणाच्या वेगाने, राजकीय सहभाग, जबाबदारी आणि शासनाच्या गतीत आमूलाग्र बदल झाला आहे. भारत ही जगातील सर्वात मोठी कृतिशील लोकशाही आहे. यामागचे कारण केवळ विशाल आकारमान नव्हे, तर त्याचे बहुत्ववादी स्वरूप आणि काळाच्या कसोटीवर खरे उतरणे यामध्ये आहे. लोकशाही परंपरा आणि सिद्धांत भारतीय संस्कृतीचे अभिन्न अंग आहेत. आपल्या समाजात समता, सहिष्णुता, शांततामय सहअस्तित्व आणि लोकशाही मूल्यांवर आधारित जीवनशैली यासारखे गुण शतकानुशतकांपासून अस्तित्वात आहेत. वास्तविक लोकशाही मुळे आपल्या राजकीय जाणिवा खूप खोलवर भिणल्या आहेत. समानता, प्रतिनिधित्व आणि सहभाग यांसारख्या तत्त्वांवर आधारित लोकशाही 21व्या शतकात मोठ्या बदलांमधून जात आहे. माहितीचा झपाट्याने प्रसार, वाढती लोकानुनयता, विषमतेची वाढती चिंता आणि हवामान बदल व महामारीसारख्या जागतिक संकटांनी लोकशाही संस्थांची प्रतिकारशक्ती तपासली आहे. या लेखात या21 व्या शतकातील लोकशाही आणि शासन यांचापरस्पर संबंध अभ्यासूनसध्याच्या आव्हानांना तोंड देण्यासाठी लोकशाही आणि शासन मजबूत करण्याच्या मार्गांचा अभ्यास केला आहे. तसेच सध्याच्या काळातील लोकशाहीचा विकास, तांत्रिक व सामाजिक-राजकीय बदलांचा परिणाम आणि जबाबदार आणि शाश्वत शासन प्रणालींच्या गरजेचा शोध घेतला जाणार आहे.

## 1. प्रस्तावना

21वे शतक लोकशाही आणि शासनासाठी नव्या संधी आणि आव्हाने घेऊन आले आहे. तंत्रज्ञानाच्या प्रगतीसह आणि जागतिकीकरणाच्या वेगाने, राजकीय सहभाग, जबाबदारी आणि शासनाच्या गतीत आमूलाग्र बदल झाला आहे. भारत ही जगातील सर्वात मोठी कृतिशील लोकशाही आहे. यामागचे कारण केवळ विशाल आकारमान नव्हे, तर त्याचे बहुत्ववादी स्वरूप आणि काळाच्या कसोटीवर खरे उतरणे यामध्ये आहे. लोकशाही परंपरा आणि सिद्धांत भारतीय संस्कृतीचे अभिन्न अंग आहेत. आपल्या समाजात समता, सहिष्णुता, शांततामय सहअस्तित्व आणि लोकशाही मूल्यांवर आधारित

जीवनशैली यासारखे गुण शतकानुशतकांपासून अस्तित्वात आहेत. वास्तविक लोकशाही मुळे आपल्या राजकीय जाणिवा खूप खोलवर भिणल्या आहेत. समानता, प्रतिनिधित्व आणि सहभाग यांसारख्या तत्त्वांवर आधारित लोकशाही 21व्या शतकात मोठ्या बदलांमधून जात आहे. माहितीचा झपाट्याने प्रसार, वाढती लोकानुनयता, विषमतेची वाढती चिंता आणि हवामान बदल व महामारीसारख्या जागतिक संकटांनी लोकशाही संस्थांची प्रतिकारशक्ती तपासली आहे. या लेखात या21 व्या शतकातील लोकशाही आणि शासन यांचापरस्पर संबंध अभ्यासूनसध्याच्या आव्हानांना तोंड देण्यासाठी लोकशाही आणि शासन मजबूत करण्याच्या मार्गांचा अभ्यास केला आहे. तसेच सध्याच्या काळातील लोकशाहीचा विकास, तांत्रिक व सामाजिक-राजकीय बदलांचा परिणाम आणि जबाबदार आणि शाश्वत शासन प्रणालींच्या गरजेचा शोध घेतला जाणार आहे.

भारत देश विशाल आणि वैविध्यता असलेला देश आहे. तो वेगवान संक्रमणकाळातून जात आहे. देशासमोर अनेक नवनवीन आव्हाने आहेत. या आव्हानांवर मात करण्याची शक्ती लोकशाही मार्गातून प्राप्त होते. त्याचसोबत देशाच्या जनतेच्या आशाआकांक्षा पूर्ण करण्याचे सामर्थ्यही आपल्या राज्यघटनेत आहे यामुळेती सर्वोत्कृष्ट मार्गदर्शक आहे. देशात कायद्याचे राज्य स्थापित करण्यासोबतच केंद्र आणि राज्यासमवेत देशातल्या सर्व लोकशाही आणि घटनात्मक संस्थांच्याशक्तीचा स्रोत राज्यघटना आहे. भारताच्या संसदीय लोकशाहीची सफलता भारताच्या राज्यघटनेच्या सुदृढ संरचनेत आणि तिच्याद्वारे विहित संस्थागत आराखड्यावर आणि आधार स्तंभावर आधारित आहे.

## 2. लोकशाहीचे बदलते स्वरूप

1) तांत्रिक विघटन आणि डिजिटल लोकशाही

डिजिटल क्रांतीने लोकशाही प्रक्रियात मोठ्या प्रमाणात बदल झाले आहे. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म वरुण राजकीय प्रचार, नागरी सक्रियता आणि सार्वजनिक चर्चेसाठीहे महत्त्वाचे साधन बनले आहेत. परंतु, चुकीची माहिती,मताचेध्रुवीकरण आणि डेटा गोपनीयतेविषयी भंग या चिंता निर्माण झाल्या आहेत.ऑनलाइनप्लॅटफॉर्मने जरी नागरिकांचा सहभाग वाढवला असला तरी, चुकीच्यामाहितीच्या गटबाजीमुळे योग्य माहितीपूर्ण चर्चा कमी होत आहे.

2) लोकानुनयता आणि लोकशाही तत्त्वांचा ऱ्हास

जगभरात तसेच भारतात लोकानुनयी चळवळी उफाळून आल्या आहेत, ज्यामुळे पारंपरिक लोकशाही संस्थांना आव्हान मिळाले आहे. यात लोकानुनयी नेते अल्पकालीन फायद्यांना प्राधान्य देत असून दीर्घकालीन शासन दुर्लक्षित करतात. न्यायपालिकेचे स्वातंत्र्य आणि प्रसारमाध्यम स्वातंत्र्य यांसारख्या लोकशाही तत्त्वांचा यामुळे ऱ्हास होऊन लोकशाहीच्या पायाभूत तत्वास धोका पोहोचवत आहे.

3) जागतिकीकरण आणि शासन

जागतिकीकरणाने विवध देशातील अर्थव्यवस्था आणि समाज एकमेकांशी जोडले आहेत, ज्यामुळे शासनासमोर गुंतागुंतीची आव्हाने निर्माण झाली आहेत. हवामान बदल, आर्थिक विषमता आणि स्थलांतर यांसारख्या समस्यांवर बहुपक्षीय सहकार्याची आवश्यकता आहे. तथापि, जागतिक शासन संरचना सर्वसमावेशक आणि पारदर्शकतेच्या अभावामुळे मर्यादित परिणामकारकता दाखवत आहेत.

## 3. 21व्या शतकातील लोकशाहीसमोरील आव्हाने

21व्या शतकात लोकशाही व्यवस्थेला अनेक प्रकारची आव्हाने समोर आली आहेत. आधुनिक तंत्रज्ञान, जागतिकीकरण, आणि बदलत्या सामाजिक व राजकीय परिस्थितीमुळे या आव्हानांचे स्वरूप अधिक गुंतागुंतीचे झाले असून खालील प्रमानेप्रमुख आव्हाने दिसून येतात.

1) सामाजिक आणि आर्थिक असमानता

समाजातील गरीबी,दारिद्र्य आर्थिक विषमता आणि बेरोजगारी इ. अडचणीवर मात करण्यास अपयश आल्यामुळे लोकांचे राजकीय नेत्यांवरील विश्वास कमी होतो आहे. संपत्ती आणि संसाधनांचे असमान वितरण लोकशाही प्रक्रियांवर परिणाम करत आहे.

2) तंत्रज्ञान व माहितीचा गैरवापर

समाजमाध्यमांमुळे चुकीचीदिशाभूल करणारी फेक माहिती जलद गतीने तात्काळ पसरते. यामुळे राजकीय पक्ष किंवा नेते यांची प्रतिमा खराब होऊन जनतेचे मतपरिवर्तन चुकीच्या दिशेने होते तसेच कधीकधी चुकीच्या महितीमुळे दंगल निर्माण होऊन कायदा आणि सु व्यस्था बिघडण्याचा प्रश्न निर्माण होतो.सोशल मीडियाच्या खोटी माहिती देऊन जनतेची दिशाभूल केली जात आहे.आधुनिक काळात तंत्रज्ञानचा गैरवापर करूनहॅकिंग करून सायबर हल्ला करणेकिंवा निवडणूक काळात सोशल मीडियाद्वारे वापरकर्त्यांचा डेटा परदेशी संस्था कडून लिक होणे आणि त्याचा निवडूक काळात प्रचारसाठी गैरवापर करणे हा लोकशाहीसाठी मोठा धोका निर्माण होतो आहे.

3) लोकशाही संस्थांवरील विश्वास कमी होणे

देशातील काही राजकीय नेते, उद्योगपती आणि शासकीय अधिकाऱ्यांवरील भ्रष्टाचाराचे आरोप आणि त्यांना मिळणारी सूट लोकशाही संस्थावरील जनतेत अविश्वास निर्माण करतात. यामुळे जनतेच्या मनात लोकशाही आणि शासनप्रतीउदासीनता निर्माण होते.

4) संस्थात्मक दुर्बलता किंवा गैरवापर

विवध कायदेशीर तसेच इतर संस्थाचा, जसे की केंद्रीय अन्वेषण विभाग, प्रवर्तन निदेशालयव मीडिया या स्वतंत्र संस्थांवर दबाव टाकून राजकीय हितासाठी त्यांचा गैरवापर केला जातो. यामुळे लोकशाही साठी महत्वाचा आधार स्तंभ असणारा घटक मीडिया हा तटस्थ कार्य ना करता ठराविक पक्षाची जाहिरात केली जाते यामुळे लोकशाही तत्वाला छेद जात आहे.

5) धार्मिक आणि जातीय ध्रुवीकरण

राजकीय फायद्यासाठीसमाजात धर्म, जात अतिरेकी कट्टरताया विवध आधारावर फूट पाडली जाते. या मुद्द्यांचा गैरवापर निवडणूक काळात होतो आणि मताचे ध्रुवीकरण केले जाते.समाजगटांतील भेदभाव आणि संघर्ष लोकशाहीला कमकुवत करतात तसेच समाजातील विवध अतिरेकीकट्टर विचारसरणीच्या गटामुळे लोकशाहीतील शांतता व स्थैर्य बिघडते.

6) जनतेचा मतदानाचा कमी सहभाग

जनतेचा मतदानातील कमी सहभाग हा लोकशाहीसाठी गंभीर चिंता बनला आहे. मतदान हा लोकशाहीचा गाभा असून, जनतेचा कमी सहभाग लोकशाही प्रक्रियेच्या यशस्वितेस अडथळा निर्माण करू शकतो. याची विवध कारणे पूढील प्रमाने आहे

- राजकीय उदासीनता (Political Apathy)

लोकांना वाटते की त्यांचे एकटे मत काहीच बदल घडवू शकत नाही. सर्व राजकीय नेते एकसारखे असतात यामुळे राजकीय व्यवस्थेवरचाजनतेचा विश्वास कमी होत आहे काही वेळा निवडणुकीतील उमेदवारांबद्दल जनता असमाधानी असते त्यामुळे मतदान केले जात नाही.

## **4.** उपाय

1) माहितीचा पारदर्शक व तांत्रिकदृष्ट्या संरक्षित वापर.
2) न्यायालय आणि माध्यमे यांसारख्या संस्थांची स्वायत्तता सुनिश्चित करणे.
3) पर्यावरण व शाश्वत विकासासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्य वाढवणे.
4) आर्थिक व सामाजिक समतेला प्रोत्साहन देणे.
5) मतदानाचे महत्त्व समजावण्यासाठी व्यापक जनजागृतीआणि लोकशिक्षणाला चालना देऊन अभियान राबवणे.विशेषतः तरुणांमध्ये राजकीय शिक्षण देणे.
6) स्थानिक वंचित गट आणि स्थलांतरित लोकांपर्यंत मतदान प्रक्रियेची माहिती पोहोचवणे. आणि त्यांना मतदार यादीत समाविष्ट करण्यासाठी विशेष उपक्रम राबवणे.
7) मतदान करणाऱ्यांसाठी नागरिकासाठी सकारात्मक प्रोत्साहन आणि प्रेरणा निर्माण करून त्यांचे मतहे कसे उपयोगी आहेहे समजावणे.

मतदान हा लोकशाहीचा आत्मा आहे. जनतेच्या सहभागाशिवाय लोकशाही व्यवस्थेचे खरे स्वरूप दिसून येत नाही. मतदान प्रक्रियेतील अडथळे दूर करून जनतेच्या सक्रिय सहभागासाठी उपाययोजना केल्यास लोकशाही मजबूत होऊ शकते.

## **5.** 21व्या शतकातील शासना समोरील आव्हाने

1) आर्थिक विषमता

समाजातील वाढत्या आर्थिक विषमतेमुळे असंतोष निर्माण झाला असून लोकशाही संस्थांवरील विश्वास कमी होत आहे. सरकारांसमोर समतोल विकासाला चालना देण्याचे आव्हान आहे, ज्यामुळे आर्थिक स्पर्धात्मकतेची हमी मिळेल.

2) पर्यावरणीय शाश्वतता

21वे शतक पर्यावरणीय संकटासाठी अभूतपूर्व ठरले आहे. प्रभावी शासनासाठी धोरण चौकटींमध्ये शाश्वततेचा समावेश करणे आणि हवामान बदलाला तोंड देण्यासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्य प्रोत्साहित करणे आवश्यक आहे.

3) संकटे आणि लवचिकता

कोविड-19 महामारीने संकट व्यवस्थापन आणि संस्थात्मक लवचिकतेचे महत्त्व अधोरेखित केले आहे. प्रभावी शासनाला आपत्कालीन प्रतिसाद आणि दीर्घकालीन नियोजन यांच्यात संतुलन राखणे आवश्यक आहे, जेणेकरून संकटाच्या काळात लोकशाही तत्त्वांचे पालन केले जाईल.

# 6. लोकशाही शासन मजबूत करण्यासाठी नाविन्यपूर्ण उपाय

1) समावेशक शासन

सर्व समावेशक शाश्वत विकास ही लोकशाहीच्या प्रगतीची किल्ली आहे. सरकारने राजकीय प्रतिनिधित्व आणि निर्णय प्रक्रियेत विविध स्तरावरील प्रतिनिधीना प्राधान्य दिले पाहिजे, जेणेकरून दुर्लक्षित गटांना धोरणांच्या निर्मितीत आवाज मिळेल.

2) तांत्रिक नवकल्पना

सुशासनासाठी तंत्रज्ञानाचा उपयोग पारदर्शकता आणि सहभाग वाढवू शकतो. ई-गव्हर्नन्स प्लॅटफॉर्म, निवडणूक प्रक्रियेसाठी ब्लॉकचेन, आणि एआय-आधारित धोरणनिर्मिती कार्यक्षमतेत सुधारणा करू शकतात.यामुळे शासन गतिमान होण्यास मदत होते.

3) नागरी शिक्षण आणि सहभाग

नागरिकांना लोकशाही मूल्यांबद्दल शिक्षित करणे आणि नागरी सहभागाला चालना देणे आवश्यक आहे. माध्यम साक्षरता आणि आलोचनात्मक विचारांना बळकटी देणे आणि चुकीच्या माहितीचा साक्षरता सामना करू शकते आणि माहितीपूर्ण सहभाग प्रोत्साहित करू शकते.

# 7. निष्कर्ष

21व्या शतकातील लोकशाही आणि शासन संक्रमणाच्या टप्प्यावर आहेत. तांत्रिक प्रगती आणि जागतिक परस्परसंवादामुळे जरी जास्त सहभाग आणि जबाबदारीसाठी संधी निर्माण होत असल्या तरी विषमता, लोकानुनयता, आणि पर्यावरणीय संकटांसारखी आव्हाने तातडीने सोडवणे आवश्यक आहे. सर्व समावेशकता, नवकल्पना, आणि लवचिकता यांचा स्वीकार करून लोकशाही या आव्हानांचा सामना करू शकते आणि नागरिकांच्या आकांक्षांना पूरक अशा शासन प्रणाली  आणि आदर्श लोकशाही तयार करू शकते.

# सन्दर्भ

प्रा. एस. आर. पाटील, 2015,लोकवाङ्मय गृह, भारतीय लोकशाही: संकटे आणि संधी
लक्ष्मीकांत, 2009, टाटा मॅकग्रॉ हिल पब्लिकेशन, . भारतीय प्रशासन
डॉ. वसंत थोरात2020, महाराष्ट्र बुक हाऊस,शासनव्यवस्थापन आणि लोकसहभाग
प्रा. शरद ठाकर2018साहित्य प्रसार केंद्र, मुंबई, लोकशाही आणि माध्यमे
डॉ. यशवंत दाते, 2014, पॉप्युलर प्रकाशन, भारतीय राजकारण आणि लोकशाही
फुकुयामा, एफ. 2014 पॉलिटिकल ऑर्डर अँड पॉलिटिकल डिके: फ्रॉम द इंडस्ट्रियल रिव्होल्यूशन टू द ग्लोबलायझेशन ऑफ डेमॉक्रसी.
डायमंड, एल. 2020, "21व्या शतकातील लोकशाहीचे ऱ्हास" जर्नल ऑफ डेमॉक्रसी.
संयुक्त राष्ट्रसंघ. 2021, शाश्वत विकास लक्ष्य अहवाल.